**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्रीमती विमल राजेश बंडगर
९८, वारद चाळ, मुरारजी पेठ,
सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी,**
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७४८/२००९/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९/०६/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७/०७/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४/०८/२००९ |
| ५ | **उपस्थिती**<br>प्रशासकीय अधिकारी,<br>श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर<br>श्री.आर.जे.मस्के<br><br>अपिलीय प्राधिकारी,<br>श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर<br>श्री.एस.व्ही.कांबळे(अधिष्ठाता यांचे प्रतिनिधी) | |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्रीमती विमल बंडगर यांना संगणक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर देण्यात येणा-या प्रतिपूर्ती व प्रोत्साहनात्मक रक्कम अदा करणे संदर्भातील कार्यवाहीबाबत | |

## विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती विमल राजेश बंडगर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दिं.८/४/२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मला माझ्या मागणीप्रमाणे मुद्दयांची माहिती प्राप्त झाली असून माझी कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे माझे अपील निकाली काढण्यात यावे,' असे अपीलकर्त्याचे दि.३/०४/२०१० चे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 8 APR 2010

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विश्वनाथ मारूती गोरे
धनगरसमाज धर्मशाळा, चाकण रोड, घुंडरे आळी,
घर नं.३१२, मु.पो.आळंदी, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहा.धर्मादाय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे, ढोले पाटील रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहा.धर्मादाय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५/२००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विश्वनाथ मारूती गोरे
धनगरसमाज धर्मशाळा, चाकण रोड, घुंडरे आळी,
घर नं.३१२, मु.पो.आळंदी, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१०.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | उत्तर नाही |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.३.१२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

धनगर सेवा संघ या संस्थेच्या संदर्भातील विश्वस्तांची नोंद, लेखा तपासणी अहवाल याची माहिती द्यावी व ही माहिती नसल्यास तसा दाखला द्यावा, अशी मागणी आपण जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहा.धर्मादाय आयुक्त,पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे यांच्याकडे केली होती. माहिती अपुरी व विलंबाने दिली. तसेच काही माहिती संस्थेकडून घेण्यास कळविले, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विश्वनाथ मारूती गोरे यांनी केले. श्री.गोरे यांना कार्यालयाकडील माहिती दिली. अन्य माहिती संस्थापातळीवरील असल्यामुळे संस्थेकडून घेण्यास सांगितले, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहा.धर्मादाय आयुक्त,पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे यांनी नमूद केले. सार्वजनिक विश्वस्त संस्थेला उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडील श्री.भास्कर शंकरराव कुलकर्णी विरूध्द राज्य माहिती आयोग, नागपूर व इतर यांच्यातील रिट पिटीशन क्र.५२४/२००८, दि.२८ एप्रिल, २००९ मधील निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यालयातील अपुरा कर्मचारी वर्ग, विश्वस्त संस्थांचे मोठे प्रमाणे व त्या संदर्भातील अर्ज, नकला आदींचे व्यापक काम व विविध स्वरूपाची माहिती मागणारे रोज किमान ६ ते ७ अर्ज अशी धर्मादाय आयुक्त कार्यालयातील परिस्थिती आहे. त्यामुळे अनेकदा माहिती विहित मुदतीत देणे शक्य होत नाही. श्री.गोरे यांच्या अर्जातील उत्तर देण्यास विलंब झाला. काही माहिती संस्थेकडून प्राप्त करून नंतर दिली, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहा.धर्मादाय आयुक्त,पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे यांनी सादर केले. तसेच मर्यादित कर्मचारीसंख्या व कामाचा व्याप यांचा तपशील त्यांनी स्पष्ट केला. कार्यालयीन उणिवांमुळे होणाऱ्या अडचणींना आपल्याला जबाबदार धरून कारवाई केली जाऊ नये, अशी विनंती त्यांनी केली.

ठिकठिकाणच्या धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनिमय, २००५ नुसार येणाऱ्या अर्जांवर विहित मुदतीत कार्यवाही केली जात नाही, असे विविध अपिलांमध्ये दिसून

येते. कामाचा ताण व अपुरी कर्मचारी संख्या हे त्याचे कारण असल्याचे बव्हंश वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे सांगितले जाते. त्यात तथ्य आहे, असे गृहित धरले, तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही होणे आवश्यक असून तशी व्यवस्था न झाल्यास कार्यालयीन उणिवांबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी शास्ती व अन्य कारवाईस सातत्याने पात्र ठरतील व ते नैसर्गिक न्यायतत्त्वास धरून उचित हेणार नाही. त्याबरोबरच अपीलकर्त्यास माहिती न मिळणे अथवा ती मिळण्यात विलंब होणे आणि विहित मुदतीत न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई न होणे हे माहितीचा अधिकार अधिनिमय, २००५ अन्वये योग्य ठरणार नाही. याची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही मुख्य धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तातडीने करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२३.४.२०१०**

प्रत:: मुख्य धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, धर्मादाय आयुक्त भवन, तिसरा मजला, ८३, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८
२/- धर्मादाय आयुक्त कार्यालयामध्ये माहितीचा अधिकार अधिनिमय, २००५ नुसार विहित मुदतीत कार्यवाही होण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था यांनी करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल एक महिन्यांत आयोगाला सादर करावा.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष आर.पाटील
३, जेलरोड, येरवडा, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
नगररोड उपविभाग, पुणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.,
येरवडा,कल्याणीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
नगररोड उपविभाग, पुणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.,
येरवडा, शास्त्रीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
नगररोड उपविभाग, पुणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.,
येरवडा,कल्याणीनगर, पुणे श्री.एस.एल.गणेशकर

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
नगररोड उपविभाग, पुणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि.,
येरवडा, शास्त्रीनगर, पुणे श्री.इ.व्ही.मामीलवाड

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

एका जागेमधील घराना दिलेल्या वीज जोडाच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.सुभाष आर.पाटील यानी मागितली होती. सन १९७९ ते २००३ या कालावधीत वीज जोड देण्यात आले. पूर्वी वीज मंडळाच्या बंडगार्डन विभागात तो भाग येत असल्यामुळे संबधित कागदपत्रे त्यांच्याकडून मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी शोध घेऊनही कार्यालयाचे दोनदा स्थलांतर आदी कारणामुळे जुनी कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत. सन २००३ पासून दिलेल्या वीज जोडणी संबंधीची कागदपत्रे मिळण्याची मागणी अपीलकर्त्याने प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी केली. त्यानुसार उपलब्ध माहिती दि.८.५.२००८ रोजी दिली. ऊर्वरित माहितीबाबत दि.२५.१.२०१० रोजी रजिस्टर्ड टपालाने कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, नगर रोड उपविभाग, पुणे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि., शास्त्रीनगर, येरवडा, पुणे श्री.इ.व्ही.मामीलवाड यांनी अपीलकर्त्याची त्या तारखेची पोहोच असलेल्या पत्राच्या प्रतीसह नमूद केले.

संबंधित जागा आपल्या मालकीची असल्याचे श्री.पाटील यांचे म्हणणे असून त्याबाबत पुरावा देण्यास आपण अपीलकर्त्यास सांगितले होते, परंतु तो त्यांनी सादर केलेला नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नगररोड उपविभाग, पुणे, महाराष्ट्र राज्य

विद्युत वितरण कं.लि., शास्त्रीनगर, येरवडा, पुणे श्री.एस.एस.गणेशकर यांनी केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.४.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सूर्यकांत रामचंद्र सैद
द्वारा सौ.सुनंदा विजय काळे
जनता विद्या मंदीर विद्यालय,
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
ग्रामपंचायत विभाग,
पंचायत समिती आंबेगाव, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत गिरवली, ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.०२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता-** श्री.सूर्यकांत रामचंद्र सैद<br>द्वारा सौ.सुनंदा विजय काळे<br>जनता विद्या मंदीर विद्यालय,<br>घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत गिरवली, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.एस.डी.नाटे | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१८.१२.२००७ |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गिरवली ता. आंबेगाव, पुणे येथील गावठाणातील घर मिळकतीला सौ.लीलाबाई नामदेव सैद यांच्या नावाची नोंद केल्याबाबतच्या कागदपत्रांच्या प्रती आपण मागितल्या होत्या, परंतु जन माहिती

अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत गिरवली, ता.आंबेगाव, जि.पुणे यांनी माहिती दिली नाही व घर मालकांकडूनसुध्दा कागदपत्रे मिळाली नाहीत. सन १९७३ मधील नोंदीचा विषय असून सन १९६९ ते १९८६ या काळातील संपूर्ण गिरवली गावाचे दस्त ऐवज उपलब्ध नसल्याचे आपल्याला कळविले आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सूर्यकांत रामचंद्र सैद यांनी केले.

उपलब्ध माहिती श्री.सैद यांना देण्यात आली. परंतु गिरवली गावाचे सन १९७०-१९८६ या कालावधीतील संपूर्ण दस्तऐवज उपलब्ध नाहीत. त्यामुळे श्री.सैद यांनी मागितलेली कागदपत्रे देता येत नाहीत तसेच या संदर्भात न्यायालयात दिवाणी दावा प्रलंबित आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत गिरवली, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.एस.डी.नाटे यांनी केले.

संपूर्ण गावाचे १७ वर्षांच्या कालावधीतील अभिलेख उपलब्ध नसणे ही गंभीर बाब आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी या प्रकाराची सखोल चौकशी करुन नियमानुसार योग्य ती कार्यवाही करणे व संबंधित अभिलेखांच्या उपलब्धतेबाबत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली.

२. गिरवली, ता.आंबेगाव,जि.पुणे या गावाचे सन १९६९-८६ या कालावधीतील दस्तऐवज उपलब्ध नसण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,पुणे यांनी सखोल चौकशी करुन कार्यवाही करावी व त्याबाबतचा अहवाल दि. ०५.०५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 15 APR 2010

प्रत,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,पुणे यांना माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुंदर साहेबराव लोंढे
जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळ, कदमवस्ती,
लोणीकाळभोर, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सहसंचालक, शिक्षण संचालनालय,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.३.२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय,
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.स.शं.शिंदे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.११.२.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ व २४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता हजर न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१०.३.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्त्यांनी चार मुद्दयांची माहिती शासन निर्णयाच्या प्रतीसह मागितली होती. त्यांचा बिनतारखेचा अर्ज दि.१.११.२००७ रोजी प्राप्त झाला. दि.८.११.२००७ रोजी त्यांना शुल्क कळविले. दि.४.१२.२००७ रोजी त्यांनी शुल्क भरल्यानंतर दि.१०.१२.२००७ रोजी रजिस्टर्ड टपालाने शासन निर्णयाच्या प्रतीसह माहिती पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.स.शं.शिंदे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि.२०.४.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त**, राज्य **माहिती आयोग, महाराष्ट्र** राज्य, **पुणे** खंडपीठ यांच्या**समोर**
**माहितीचा अधिकार** अधि**नियम, २००५ कलम १९** (३) अन्वये दाखल झालेले **अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. पंडित कृष्णा लिंभोरे
मु. पो. हिवरे,ता. पुरंदर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, — उत्तरवादी
पंचायत समिती, पुरंदर, ता. पुरंदर,जि. पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, हिवरे,
ता. पुरंदर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८९७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १७.२.२०१० |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. पंडित कृष्णा लिंभोरे
मु. पो. हिवरे,ता. पुरंदर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, पुरंदर, ता. पुरंदर,जि. पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. महेश संभाजी म्हेत्रे

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, हिवरे,
ता. पुरंदर, जि. पुणे श्री. गुलाब यदू गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.४.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

स्वजलधारा योजनेतील कामाचे हिशेब चुकीचे दिलेले असून अनेक व्हौचर्स कोरी आहेत, लोकवर्गणीतून दिलेल्या निधींच्या पावतीवर नावे नाहीत, या कामात भ्रष्टाचार झाला असून त्याची चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. पंडित कृष्णा लिंभोरे यांनी केली.

अपीलकर्त्याला विहित मुदतीत शुल्क कळविले. त्यांनी शुल्क भरल्यानंतर सर्व माहिती दिली. प्रथम अपिलाच्या वेळी त्यांनी आणखी काही माहिती मागितली, ती त्याच वेळी दिली. आणखी तपशील हवा असल्यास देण्याची तयारीही त्यावेळी दर्शविली, असे जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, हिवरे, ता. पुरंदर श्री. गुलाब यदु गायकवाड यांनी दिलेल्या माहितीच्या प्रतीसह नमूद केले.

मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहितीची मागणी अपिलात करता येणार नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे. कामातील भ्रष्टाचाराची चौकशी व त्या अनुषंगाने अपीलकर्त्याची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 26 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीनिवास वासुदेव फाटक
द्वारा, श्री.प्रकाश सोलंकी
रुम नं.२, धोबी घाट, पुना कॉलेज समोर, पुणे-१ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उपायुक्त,
परिमंडळ-२, पुणे शहर यांचे कार्यालय, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त,
वानवडी, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७९८/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.०२.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री.श्रीनिवास वासुदेव फाटक<br>द्वारा, श्री.प्रकाश सोलंकी<br>रुम नं.२, धोबी घाट, पुना कॉलेज समोर, पुणे-१<br>**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उपायुक्त,<br>परिमंडळ-२, पुणे शहर यांचे कार्यालय, पुणे-१<br>डॉ.जालींदर सुपेकर<br>**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त,<br>वानवडी, पुणे शहर, पुणे<br>श्री.विठ्ठल टिकाराम पवार | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०७.११.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२३.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.०१.२००८ |
| ८ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी** :- पुणे कॅन्टोमेंट बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एस.के.सरदाणा यांनी भा.दं.वि.च्या कलम १०९ व ३२५ अन्वये दाखल केलेल्या लेखी फिर्यादी बाबत | |

## विवेचन

आपल्यावर हल्ला करणाऱ्या आरोपींची नावे पोलिसांनी नोंदविली नाहीत. 'अज्ञात इसमाचा हल्ला' असे नमूद केले. अडीच महिन्यांनी एफ. आय.आर. दाखल का केला, याचे उत्तर दिले नाही. आपल्या जिवाला धोका असतानांही पोलिसांनी योग्य कार्यवाही केली नाही. अशी तक्रार अपीलकर्ता श्री.श्रीनिवास वासुदेव फाटक यांनी केली.

श्री.फाटक यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तपास करुन आरोपीविरुध्द कायदेशीर कारवाई केलेली आहे. याच विषयाबाबत ते वारंवार माहिती मागत असतात व ती वेळोवेळी दिलेली आहे. एफ.आय.आर. मध्ये संशयितांची नावे असून ' ई ' फॉर्म मध्ये ती नोंदविण्याचे राहिले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी, पुणे शहर, पुणे श्री.विठ्ठल टिकाराम पवार यांनी केले. श्री.फाटक यांच्या फिर्यादीनुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त,परिमंडळ-२, पुणे शहर यांचे कार्यालय, पुणे-१ डॉ.जालिंदर सुपेकर यांनी सादर केले.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता पोलिसांच्या तपासाविषयी अपीलकर्त्याचे आक्षेप आहेत. परंतु ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत निर्णयाची नाही. एफ.आय.आर. मधील संशयितांची नावे फॉर्ममध्ये नोंदविण्याचे राहिले आहे, असे पत्र जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी, पुणे शहर, पुणे श्री.विठ्ठल टिकाराम पवार यांनी या अनुषंगाने पूरक माहितीचा भाग म्हणून अपीलकर्त्यास द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी, पुणे शहर, पुणे श्री.विठ्ठल टिकाराम पवार यांनी दि.३१.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बी.एन.शिंदे
पोस्ट बॉक्स नं.१३, गणेशखिंड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड रोड, पुणे डॉ.माणिक जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती अरूणा चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.९.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.१०.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.७.११.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१०.१२.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२४.२.२०१० रोजी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांबाबतची असतानाही अपुरी व सदोष अशी दिली. अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांनी सुनावणीसाठी आपल्याला न बोलावता एकतर्फी निर्णय दिला, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.बी.एन.शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.शिंदे यांनी तीन महाविद्यालयांच्या संदर्भात जून २००६ ते ऑक्टोबर २००७ या काळातील विस्तृत माहिती मागितली होती. वस्तुतः ती ती महाविद्यालये ही स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरणे असल्यामुळे अपीलकर्त्याने मागासवर्गीय विद्यार्थीसंख्या आदींबाबत त्यांच्याकडून माहिती घ्यावयास हवी होती. तथापि, विद्यापीठाकडील सर्व माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे श्रीमती अरूणा चव्हाण यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे अपिलाचा निर्णय दिला. संबंधित महाविद्यालयांविषयीची विद्यापीठाकडील सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याचा आदेश तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिला, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.बी.डी.उढाणे यांनी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, गणेशखिंड रोड, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२८.४.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर हरी तडाखे
३७, औंध रोड, खडकी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण
व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण
व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८०६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण
व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.एस.व्ही.संकपाळ

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण
व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.एस.बी.पानसरे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.७.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१.१२.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.४.१.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३०.१.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी कोणीही हजर न राहिल्यामुळे दि.२५.२.२००९ रोजी पुन्हा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश केला गेला. त्यावेळी अपीलकर्ता हजर न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१७.२.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.शंकर हरी तडाखे यांनी मागितलेली माहिती त्यांना मुदतीत देण्यात आली. संबंधित इमारतीमध्ये अवैध व्यवसाय चालू असल्याची त्यांची तक्रार हा आपल्या अखत्यारीतील व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणारा विषय नाही. तसे त्यांना स्पष्ट करण्यात आले. अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या निर्णयानुसार याबाबतची खात्याकडील सर्व माहिती त्यांना पुन्हा हातोहात देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.एस.बी.पानसरे यांनी पूरक कागदपत्रांसह केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१७.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत सोनू जगताप
बी/२/४०२, अनुसया एन्क्लेव्ह, वानवडी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली,
शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली,
शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८१५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शशिकांत सोनू जगताप
बी/२/४०२, अनुसया एन्क्लेव्ह, वानवडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली,
शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे श्री.विजय पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली,
शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे श्री.जगदीश निंबाळकर

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२५.१.२००८ |
| ५ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता हजर न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१६.२.२०१० रोजी घेण्यात आली.

वारस नोंदीबाबत सन १९९८ मध्ये मंडल अधिकाऱ्यांकडे झालेल्या सुनावणीचा लेखी निकाल मिळाला नाही, तो सहीशिक्क्यानिशी मिळावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.शशिकांत सोनू जगताप यांनी माहिती मागणीच्या मूळ अर्जात व राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

श्री.जगताप यांनी वारस नोंदीच्या अर्जाचा क्रमांक आदी तपशील दिलेला नाही. त्यामुळे नेमकेपणाने शोध घेता येत नाही. तरीही त्यांच्या अर्जानंतर मंडल अधिकारी व तलाठी यांच्याकडून अहवाल मागविला आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे श्री.जगदीश निंबाळकर यांनी केले.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती'च्या व्याख्येत येत नाही. मात्र या संदर्भात मंडल अधिकारी व तलाठी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी. तसेच तत्कालीन मंडल अधिकारी यांच्याकडून संबंधित निकालाबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल मागवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली, शुक्रवार पेठ, ता.हवेली, जि.पुणे यांनी दि. २५.५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. किशोर वसंतराव कुऱ्हाडे
१९५५, कुऱ्हाडेवाडा, आळंदी देवाची,
ता. खेड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय, (नगरपालिका शाखा),
विधान भवन, पुणे-४११ ००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
आळंदी नगरपरिषद, ता. खेड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८१७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १६.२.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** - श्री. किशोर वसंतराव कुऱ्हाडे<br>१९५५, कुऱ्हाडेवाडा, आळंदी देवाची,<br>ता. खेड, जि. पुणे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,<br>विभागीय आयुक्त कार्यालय, (नगरपालिका शाखा),<br>विधान भवन, पुणे-४११ ००१ श्री. प्रकाश सं. पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,<br>आळंदी नगरपरिषद, ता. खेड, जि. पुणे श्री. पी. ए. वंजेरी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.३.२००८ |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण दि. १८.९.२००७ च्या अर्जाने मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री. संजीव ओहोळ यांनी दिली नाही, म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नगरपालिका शाखा, विधान भवन, पुणे यांच्याकडे अपील केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नसल्याचा निष्कर्ष नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी अपील मान्य केले. जवळ जवळ ८० दिवसांनी, म्हणजे दि. १२.२.२००८ रोजी श्री. ओहोळ यांनी काही माहिती दिली. परंतु ती अपुरी व दिशाभूल करणारी होती. योग्य ती माहिती तात्काळ देण्याचे आदेश देऊनही श्री. ओहोळ यांनी माहिती दिली नाही. दि. २५.११.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री. पी. ए. वंजेरी हे हजर होते. दोन दिवसांत माहिती देण्याचे त्यांनी लेखी नमूद केले. तथापि आतापर्यंत त्यांनी ही माहिती दिली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची कोणतीही दखल न घेणारे श्री. ओहोळ व श्री. वंजेरी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. किशोर वसंतराव कुऱ्हाडे यांनी केली.

दि. २०.६.२००८ पासून आपण मुख्याधिकारी तथा जन माहिती अधिकारी असून 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी कबूल करूनही माहिती देता आली नाही. संबंधित खातेप्रमुख कपाटाला कुलूप घालून जातात. त्यामुळे कागदपत्रे देता आली नाहीत. आता एका दिवसांत माहिती देता येईल, असे प्रतिपादन श्री. वंजेरी यांनी केले.

श्री. ओहोळ व श्री. वंजेरी या दोघांनी तत्परतेने माहिती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नगरपालिका शाखा, विधान भवन, पुणे श्री. प्रकाश सं. पाटील यांनी नमूद केले.

वरील तपशील लक्षात घेता जन माहिती अधिकारी श्री. संजीव ओहोळ व श्री. पी. ए. वंजेरी यांनी माहिती देण्याबाबत पूर्णपणे अनास्था दर्शविली आहे. श्री. ओहोळ दि. २०.६.२००८ दिनांकापर्यंत आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारीपदी होते. दि. १८.९.२००७ च्या अर्जाच्या संदर्भात काही माहिती त्यांनी दि. १२.२.२००८ रोजी म्हणजे ३० दिवसांची विहित मुदत वजा जाता ११८ इतक्या दिवसांनी दिली. योग्य माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिल्यानंतरही पुढील कार्यवाही त्यांनी केली नाही. ते दि. २०.६.२००८ पर्यंत मुख्याधिकारी पदी होते. श्री. वंजेरी दि. २०.६.२००८ पासून या पदावर असून दि. १६.२.२०१० पर्यंत माहिती देण्याबाबत त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे श्री. ओहोळ व श्री. वंजेरी हे शास्तीस पात्र ठरतात.

श्री. कुऱ्हाडे यांनी मागितलेली माहिती तीन दिवसांत निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि. १९.२.२०१० रोजी श्री. वंजेरी यांनी पूर्तता केल्याचे माहितीच्या प्रतींसह आयोगास अवगत केले. दिलेली माहिती पाहता ती देण्यास ३० दिवसांपेक्षा अधिक विलंब लागण्याचे कोणतेही कारण नाही, असे स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. श्री. संजीव ओहोळ व श्री. पी. ए. वंजेरी या दोघांनीही माहिती देण्यास जन माहिती अधिकारी या पदाच्या आपापल्या सेवा काळात सहा महिन्यांहून अधिक कालावधी व्यतीत केला आहे. श्री. ओहोळ यांनी ११८ दिवसांनी दिलेली माहितीही अत्यंत त्रोटक व अपूर्ण आहे. त्यामुळे या दोघांनाही प्रत्येकी रू. २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती श्री. ओहोळ यांच्या मे, जून, जुलै व ऑगस्ट २०१० या महिन्यांच्या व जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून, तसेच श्री. पी. ए. वंजेरी यांच्या मे, जून, जुलै व ऑगस्ट २०१० या

महिन्यांच्या व जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून चार समान हप्त्यांत वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८), माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नगरपालिका शाखा, विधान भवन, पुणे यांनी करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा. श्री. ओहोळ व श्री. वंजेरी यातील कोणीही सेवानिवृत्त झाले असल्यास शास्तीची रक्कम त्यांच्या सेवानिवृत्तीवेतनातून मे २०१० च्या व जून २०१० ला देय असलेल्या वेतनापासून सहा हप्त्यात वसूल करावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

पुणे
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गोरख काळुराम तळेकर
मु.डुडुळगाव, पो.आळंदी देवाची, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२,
पुणे शहर यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे शहर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गोरख काळुराम तळेकर
मु.डुडुळगाव, पो.आळंदी देवाची, ता.हवेली, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
स्वारगेट विभाग, पुणे शहर, पुणे श्री.ए.एस.येवले

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.८.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१४.८.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१.१२.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२३.२.२०१० रोजी घेण्यात आली.

सप्टेंबर २००७ मध्ये केलेल्या आपल्या अर्जानुसार सप्टेंबर २००८ मध्ये माहिती दिली. त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर, पुणे यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.गोरख काळुराम तळेकर यांनी केली.

अपीलकर्त्यास सर्व माहिती समक्ष देण्यात आली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर, पुणे श्री.ए.एस.येवले यांनी सांगितले.

माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशीलवार अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर, पुणे यांनी चार दिवसात सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर, पुणे श्री.एन.आर.डांगे यांनी दि.२३.२.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. श्री.तळेकर यांनी नमूद केलेला माहिती-मागणीचा मूळ अर्ज आपल्या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्याकडे त्यांनी केलेला अपील अर्ज दि.६.१२.२००७ रोजी प्राप्त झाला. संबंधित पोलीस ठाण्याकडे माहितीसाठी तो अर्ज पाठवून मूळ प्रकरणात कार्यवाही करणाऱ्या

संबंधित पोलीस हवालदाराचा खुलासा घेऊन माहिती सादर करण्यास वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना कळविले. त्यांच्याकडून दि.९.१.२००८ रोजी आलेल्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यांना त्याच दिवशी देण्यात आली, असे श्री.डांगे यांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे. ते लक्षात घेता मूळ प्रकरणातील प्रशासकीय कार्यवाहीसह त्यांनी माहिती दिली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२०.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रेमसुख बिहारीलाल मंत्री
सि.स.नं.२४९४, दौंड पाटस रस्ता,
दौंड, जि. पुणे-४१३ ८०१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, दौंड, ता. दौंड, जि. पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १०.३.२०१० |

४ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. प्रेमसुख बिहारीलाल मंत्री
सि.स.नं.२४९४, दौंड पाटस रस्ता,
दौंड, जि. पुणे-४१३ ८०१

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, दौंड, ता. दौंड, जि. पुणे श्री. बाळासाहेब मु. तावरे

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव,
कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड, जि. पुणे श्री. तात्यासाहेब दत्तात्रय टुले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. | |

# विवेचन

मागितलेली माहिती मुदतीत व पूर्ण मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता यांचे चिरंजीव श्री. प्रमोद प्रेमसुख मंत्री यांनी केली.

अपीलकर्ता श्री. प्रेमसुख बिहारीलाल मंत्री यांनी सन १९८२ ते २००७ या कालावधीतील माहिती मागितली होती. त्यातील काही मुद्दयांबाबत स्पष्टता होत नव्हती, त्यामुळे काही माहिती विहित मुदतीत दिली, व अन्य मुद्दयांबाबत विचारणा केली. त्यानंतर त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दौंड यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मूळ अर्जाव्यतिरिक्तच्या मुदयांसह सर्व माहिती त्यांना नि:शुल्क दिली, त्याची पोहच आहे. या संदर्भात त्यांच्याशी वेळोवेळी पत्रव्यवहारही केला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सचीव, कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड श्री. तात्यासाहेब दत्तात्रय टुले यांनी संबंधित कागदपत्रांच्या प्रतींसह नमूद केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याला दुजोरा दिला.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा सचीव, कृषि उत्पन्न बाजार समिती, दौंड व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दौंड यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. नक्कल शुल्काबाबत अपीलकर्त्याचा आक्षेप असून संबंधित नकलांसाठी शासनाने पूर्वी निर्धारित केलेल्या शुल्कानुसार आकारणी करण्यास नियमानुसार अनुमती देण्यात आलेली आहे. त्यानुसार उभय बाजूंनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 20 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

ॲड. विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं.२९, चौथा मजला,
पुण्याई नगर, धनकवडी, पुणे-४३

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पुणे शहर
शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - ॲड. विकास जोशी
साई सदन, फ्लॅट नं.२९, चौथा मजला,
पुण्याई नगर, धनकवडी, पुणे-४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पुणे शहर
शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२ श्री. दत्तू नवले

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे-४११ ००२
श्री. पी. एस. खाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.२.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायांकित प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९९५ मधील जमीन वाटपाच्या आदेशासंदर्भातील आपण मागितलेल्या जाब-जबाबाच्या व अन्य कागदपत्रांच्या प्रती आढळ होत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर यांनी कळविले. अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलाची दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता ॲड. विकास जोशी यांनी केली.

सन १९९५ मधील संबंधित प्रकरणातील कागदपत्रांच्या प्रती शोध घेऊनही आढळल्या नाहीत. तसे तसेच अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविण्यात आले, तसेच फेरफाराची प्रत देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर श्री. पी. एस. खाडे यांनी केले.

अपिलाच्या सुनावणीसाठी तीन तारखा दिल्या परंतु अपीलकर्ता उपस्थित राहिले नाहीत. 'गुणवत्तेवर निकाल द्यावा,' असे त्यांनी लेखी कळविले. त्यानुसार निर्णय दिला, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर श्री. दत्तू नवले यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

याच विषयाच्या संदर्भातील अपीलकर्त्याचे अपील क्र. २५९६/पुणे मध्ये आयोगाने दि. १९.५.२००९ रोजी दिलेल्या आदेशाची पूर्तता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर श्री. पी. एस. खाडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर श्री. दत्तू नवले यांनी केली नसल्याचे ॲड. जोशी यांनी निदर्शनास आणले, ते रास्त आहे. ही बाब गंभीर असून संबंधित विषयात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाला सादर केला जाणे, तसेच कागदपत्रांचा शोध घेऊन माहिती दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अभिलेखाचा शोध घेऊन पंधरा दिवसांत अपीलकर्त्यास माहिती देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्याबाबतच्या कार्यवाहीचा अहवाल विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर श्री. पी. एस. खाडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर श्री. दत्तू नवले यांनी दि. २६.४.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. अपील क्र.२५९६/पुणे मध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुणे शहर श्रीमती आशा होळकर व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुणे शहर श्री. विक्रांत चव्हाण यांनी सादर न केल्याबाबतच्या कारणासह खुलासा दि. २६.४.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. 15 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मनोहर श्रीरंग तावरे
मु.पो.मोरगाव, ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, बारामती, ता.बारामती, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मोरगाव, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मनोहर श्रीरंग तावरे
मु.पो.मोरगाव, ता.बारामती, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत मोरगाव, ता.बारामती, जि.पुणे श्री.एस.बी.साळुंके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.१.२००८ व ११.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.११.३.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली.

राजकीय नेते, कार्यकर्ते यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामपंचायतीतर्फे देण्यात येणाऱ्या जाहिरातींची माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोरगाव, ता.बारामती, जि.पुणे यांनी अपुरी व विलंबाने दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले यांनी केली.

अपीलकर्त्याच्या वृत्तपत्राला जाहिरात देण्याबाबतचा अपीलकर्त्याचा मुख्य विषय आहे. मात्र अशा प्रकारच्या जाहिराती देण्याची तरतूद नियमानुसार ग्रामपंचायतीकडे नसते. सदस्यांनी स्वतंत्रपणे जाहिराती दिल्यास त्याचा ग्रामपंचायतीच्या खर्चाशी संबंध नसतो. अपीलकर्त्यास तसे स्पष्ट केलेले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मोरगाव, ता.बारामती, जि.पुणे श्री.एस.बी.साळुंके यांनी केले. तीन गावांच्या ग्रामसेवक पदांचा अतिरिक्त कार्यभार आपल्याकडे असल्याचे त्यांनी नमूद केले.

वृत्तपत्रात जाहिरातीसाठी ग्रामपंचायतीने हजारो रूपयांचा खर्च बेकायदेशीरपणे केला, त्याची चौकशी झाल्यास सत्य उघड होईल म्हणून माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन

श्री.तावरे यांनी केले. परंतु ही तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाची नाही. जन माहिती अधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे

28 APR 2010